# ‘जातिव्यवस्था आणि ईश्वर नाकारला पाहिजे’ – सुधीर अनवले



**सुधीर अनवले,** उदगीर
यांनी या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

जयभीम,

दलितांपेक्षा दलित असलेल्या भटक्या-विमुक्तांच्या चळवळीमध्ये मी लातूर भागात काम करतो.भटक्या-विमुक्तांचा संघर्ष हा मानवमुक्तीचा संघर्ष आहे, असं आम्ही मानतो.याचं कारण असं की, या जमाती अस्पृश्य नाहीत, तर त्या उपेक्षित आहेत. उपेक्षितता कधी जन्माला येते? जेव्हा अस्पृश्यतेचा अतिरेक होतो, तेव्हा उपेक्षितता जन्माला येते. उपेक्षित असणं याचा अर्थ पूर्णपणे दुर्लक्षित असणं. ज्या जमाती अलुतेदारीमध्ये आहेत, त्या सगळ्या जमाती इथे उपेक्षित राहिलेल्या आहेत, वंचित राहिलेल्या आहेत.याचं कारण असं की, या जमाती गरीब आहेत, अज्ञानी आहेत आणि असंघटित आहेत. त्यामुळे यांचे जे काही प्रश्न आहेत, यांचं जे काही दुखणं आहे,किंवा वेदना आहेत, त्या इथल्या प्रस्थापित व्यवस्थेच्या लक्षात आल्याच आहेत, असं नाही.

या सगळ्या जमाती गावगाड्याच्या बाहेर राहतात. म्हणजे जिथे गावाची शीव संपते, तिथे गावाच्या शिवेच्या शेजारी सगळ्या दलितांची वस्ती असते. आमची वस्तीसुद्धा गावाच्या पलीकडे राहते. म्हणजे जिथे लोक संडासला जातात, किंवा

ज्या जागेला आपण हागणदारी म्हणतो, ती आमच्या भटक्या-विमुक्त लोकांची वतनदारी असते. आलेली सगळी पालं तिथेच उतरतात. तिथूनच आमचे सगळे व्यवहार सुरू होतात. पोट भरण्यासाठी म्हणून आमच्या जमातीतील माणसं भीक मागत असतात, चोऱ्यामाऱ्या करत असतात. समाजाला मान्य नसलेले किंवा ज्या व्यवसायांना या व्यवस्थेमध्ये प्रतिष्ठा नाही असे व्यवहार आम्ही करत असतो.आणि त्यामुळे होतं असं की, जेव्हा तुम्ही करत असलेल्या कामालाच प्रतिष्ठा नसते,तेव्हा त्या जमातीच्या माणसाला सुद्धा ती प्रतिष्ठा नसते. आणि या सगळ्याचा जर विचार केला, तर आज आम्हाला गावात घर नाही आणि रानात शिवार नाही. याविषयी आम्ही सातत्याने बोलत असतो. गावात एखाद्याचं घर असलं की, शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोचतात. पण आमचं असं होतं की, गावात आमचं घरच नसतं. आम्ही गावाची शीव जेव्हा पाठीवर घेऊन फिरत असतो, म्हणजे 'विंचवाचं बिऱ्हाड' पाठीवर अशा पद्धतीने जेव्हा आम्ही कायम फिरत असतो, तेव्हा शासकीय योजना कोणती चाललेली आहे, याची आम्हाला माहिती नसते. आणि त्यामुळे आम्ही गावात कधी आलो तर सर्व्हे झालेला असतो आणि आम्ही कायम वंचित राहतो. त्यामुळे मग आमच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न निर्माण होतात. सकाळची चूल पेटली, तर संध्याकाळची पेटेलच असं विश्वासाचं वातावरण आजपर्यंत कोणत्याही सरकारने या महाराष्ट्रात, या देशात (कारण भटके-विमुक्त केवळ महाराष्ट्रातच आहेत असं नाही) दिलेलं नाही. भटके-विमुक्त पूर्ण देशामध्ये आहेत. पूर्णपणे फिरणाऱ्या या जमाती आहेत. कोणतंही सरकार जरी सत्तेवर आलेलं असलं तरी यांपैकी कोणत्याही सरकारांनी आमच्याकरता काहीही भलं केलेलं नाही.

आणि त्यामुळे एक तर घर नाही आणि दुसरा अतिशय महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आम्ही सगळेजण शिक्षणापासून फार दूर आहोत. म्हणजे आजही आपण सर्व्हे केला तर, आणि लोक काहीही म्हणत असले तरी, आज आपल्या लक्षात येईल की, आजचे जे तरुण शिकत आहेत, ते सगळे कॉम्प्युटरची भाषा बोलतात एकविसाव्या शतकामध्ये. आणि आम्ही 'बे एकं बे' चा पाढा म्हणतो. म्हणजे आम्हाला किती पुढे जावं लागेल हे आपल्या लक्षात येईल. मग हे सगळं करत असताना आत्ताचा जो ट्रेन्ड आहे, त्याच्याशी जर आम्हाला जुळवून घ्यावं लागेल असं असेल, तर आम्हाला कार्यकर्ता म्हणून खूप मोठं काम करावं लागणार आहे. पहिल्यांदा आम्हाला शिक्षणामध्ये यावं लागेल. कारण आजही जर आपण सर्व्हे केला तर काय दिसतं?

उदाहरण म्हणून सांगतो, की, समजा आपण मसणजोगी समाज बघितला, तर आजही या समाजात हातावरच्या बोटावर मोजण्याइतकेच डॉक्टर्स आपल्याला सापडतील. उदाहरण म्हणून आपण जर नांदेड जिल्हा घेतला, तर तिथे या समाजातून पहिली मुलगी परवा एम.बी.बी.एस. झाली आहे. आमच्या लातूर जिल्ह्याचा आपण विचार केला तर, आजही तिथल्या मसणजोगी समाजामध्ये, तिथल्या कतारी समाजामध्ये अजून एकही मुलगा आपल्याला बारावी झालेला दिसत नाही.

म्हणजे शिक्षणामुळे विकास होतो, प्रगती होते,असं आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा आम्ही त्या प्रक्रियेतच नाही, असं आमच्या लक्षात येतं. मग अलीकडच्या काळामध्ये आयसीएससी किंवा सीबीएससीचा जो अभ्यासक्रम आलेला आहे, त्याच्यामध्ये आम्ही कधी जाणार असा प्रश्न पडतो. आम्ही मुळातच जिल्हा परिषदेत आहोत. मग आता या दृष्टिकोनातून आम्ही असा प्रयत्न करतो

आहोत की, कुठेतरी एका ठिकाणी मुलांची योग्य सोय व्हावी. आता आश्रमशाळा निघालेल्या आहेत, पण आश्रमशाळा व्यवस्थित चालत नाहीत. आमच्या मुलांचं तिथे शोषणच होतं. आणि म्हणून या शिक्षणाच्या प्रक्रियेतून सुद्धा आम्ही बाहेर पडतो.

बाब अशी आहे की, अलीकडच्या काळामध्ये आमच्या सगळ्या भटक्या-विमुक्तांचं जीवन हे जातीच्या प्रमाणपत्रावर अवलंबून आहे. आणि जर २०२०मध्ये सुद्धा आम्हाला जातीची प्रमाणपत्रं मिळत नसतील, तर पुढे होणार कसं? भटक्या-विमुक्तांचा प्रश्न असा आहे की, या सगळ्या बेचाळीस जमाती आहेत. त्या सगळ्या छोट्या छोट्या जमाती आहेत. त्या सगळ्यांना एकत्रित करणं म्हणजे राळ्याचा लाडू बांधण्यासारखं आहे. राळ्याचा लाडू कधी एकत्रित बांधता येत नाही, तशाच या जमाती कधी एकत्रित होऊ शकत नाहीत. कारण या प्रत्येक जमातीची संस्कृती, पोत वेगवेगळं आहे. त्यांची भाषा वेगवेगळी आहे. त्यांच्या देवदेवता वेगवेगळ्या आहेत.त्यांची राहणी-करणी वेगवेगळी आहे. त्यांचं राहणीमान वेगळं आहे. ही सगळी विविधता आहे. आणि म्हणून जरी असं म्हटलं जात असलं की, 'विविधता में एकता है', तरी मला असं वाटतं की, ते पूर्णपणे फोल आहे. 'विविधता'मध्ये 'अनेकता'च असते. आणि विविधतेमध्येच विरोध असतो.

मग हे सगळे विरोधाभास असणाऱ्या या सगळ्या जमाती जेव्हा एकत्रित राहतात, तेव्हा त्यांचे सगळे प्रश्न खूप मोठ्या प्रमाणावर निर्माण होतात. आणि याचा अर्थच असा की, ही जी जातिव्यवस्था आहे, ती तुम्ही नाकारली पाहिजे. पहिल्यांदा ईश्वर नाकारला पाहिजे. त्यानंतर जातिव्यवस्था नाकारली पाहिजे. जेव्हा तुम्ही या दोन्ही गोष्टी नाकारता, तेव्हा तुम्हाला निरामय जीवन जगता येऊ शकतं. माणूस म्हणून तुम्ही या व्यवस्थेत उभे राहू शकता. अन्यथा मग जगण्यासाठी तुम्हाला सातत्याने संघर्ष करावा लागतो. १९७२मध्ये सुरू झालेली ही चळवळ आज २०२०मध्येही सुरू आहे. म्हणजे मला असं म्हणायचं आहे की, पन्नास वर्षांच्या या कालावधीत आमच्या किमान तीन पिढ्या गेल्यानंतरही आमचे प्रश्न अजून जसेच्या तसेच राहिलेले आहेत.

मित्रहो, भटक्या-विमुक्तांचे जगण्याचे प्रश्न खूप आहेत. आमच्या 'भारतीय भटक्या-विमुक्त जमाती विकास संघटने'च्या वतीने आम्ही आमच्या भटक्या-विमुक्त जमातींच्या दैनंदिन जगण्यातले जे प्रश्न आहेत, त्या प्रश्नांवर कायम संघर्षाची भूमिका घेत असतो. आणि ही भूमिका घेत असताना आम्हाला त्या माणसाला कोणत्या पद्धतीने, कशा रीतीने त्याच्या हिताच्या संदर्भातलं वातावरण निर्माण करता येईल हे आपल्याला लक्षात आणून द्यायचं आहे. बोलण्यासारखं भरपूर आहे. आपण मला संधी दिली. 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने मला पुरस्कार देऊन आमच्या चळवळीचा सन्मान केला. इथे मी महत्त्वाचा नाही, चळवळ महत्त्वाची आहे. आपण सगळ्यांनी माझं म्हणणं ऐकून घेतलं, त्याबद्दल धन्यवाद!!

*sudhirvjnt94@gmail.com/9422470598*

---

* *व्हीडिओ भाषणाचं शब्दरूप :*
*शुभदा चंद्रचुड / smcmrc@gmail.com/9881402798*